# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 14 July 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १४ जूलै २०२५ दुपारी १.०० वा.**

****

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान मिळाल्याबद्दल आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन दिलं. ही दुर्गसंपदा राज्याचा वारसा असून, जागतिक पातळीवर हा मान मिळणं ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. लोककल्याणसाठी तसंच स्वराज्य रक्षणासाठी या किल्ल्यांचं बांधकाम करण्यात आलं असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेवरील विचार, काळाच्या पलिकडे असल्याचं मत युनेस्कोच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. राज्यातल्या या किल्ल्यांचा, वारसा यादीत समावेश झाल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री, परराष्ट्र मंत्री, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्यासह राज्यातल्या इतर अधिकाऱ्यांचे आभार मानले. युनेस्कोचं हे मानांकन टिकवणं मोठं आव्हान असून, या किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी नागरीकांनी हातभार लावण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

दरम्यान, १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान मिळाल्याबद्दल महाराष्ट्र विधानभवन परिसरात आज शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातले इतर मंत्री आणि आमदार यावेळी उपस्थित होते. विधिमंडळ पायऱ्यांवर देखील छत्रपती शिवरायांचा जयघोष करण्यात आला.

****

कुठल्याही अनधिकृत बांधकामांना सरकार पाठीशी घालणार नाही आणि त्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. मुंबईतल्या अनधिकृत बांधकामांची

यादी आणि त्यांचं वर्गीकरण करण्याचे आदेश त्यांनी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना दिले असून, या बांधकामावर कारवाई करणार असल्याचं त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

****

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह ऑक्सिओम-फोर मोहिमेतल्या तीन सहकाऱ्यांच्या परतीचा प्रवास आजपासून सुरू होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता यानाच्या अनडॉकिंगचं नियोजन करण्यात आलं असून, उद्या मंगळवारी दुपारी तीन वाजता हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील. या मोहिमेअंतर्गत १४ दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी विशेष सात प्रयोग केले आहेत.
दरम्यान, शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून निरोप घेताना मनोगत व्यक्त केलं. आजचा भारत सर्वात सुंदर दिसत असल्याचं सांगत त्यांनी अंतराळातून भारताला महत्त्वाकांक्षी, निडर आणि आत्मविश्वासाने भरलेला म्हटलं आहे

****

देशाचे माजी गृहमंत्री, राज्याचे माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. नांदेडमध्ये धनेगाव इथल्या शंकरराव चव्हाण यांच्या समाधीस्थळावर माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आमदार श्रीजया चव्हाण यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. डॉ. शंकरराव चव्हाण जयंतीनिमित्त नांदेडमध्ये आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यानिमित्त देण्यात येणाऱ्या कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कारांचं वितरण आज राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांना साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातल्या भरीव योगदानासाठी जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे.

****

भारतीय उद्योग महासंघ - सीआयआय च्या भागीदारीने छत्रपती संभाजीनगर इथं ऑरिक या औद्योगिक क्षेत्रात २० हजार चौरस फूट क्षेत्रावर कौशल्य विकास केंद्र स्थापन केलं जाणार आहे. यासाठीच्या सामंजस्य करारावर पुढील आठवड्यात स्वाक्षरी होणार असल्याचं उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभागाचे सचिव अमरदीप सिंग भाटिया यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर इथे औद्योगिक पायाभूत सुविधा आणि स्टार्टअप विकासाचा आढावा घेताना ते बोलत होते.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा प्रारुप आराखडा आज जाहिर होणार आहे. यामध्ये ६३ गट आणि १२६ गणांचा समावेश आहे. २१ जुलैपर्यंत हरकती आणि सूचना मागविण्यात येणार असून, त्यानंतर विभागीय आयुक्तांसमोर सुनावणी झाल्यानंतर हा प्रारूप आराखडा अंतिम करण्यात येईल, अशी माहिती उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी दिली. निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार १८ ऑगस्टपर्यंत प्रभाग रचना तयार करण्यात येणार आहे.

****

अँडरसन-तेंडुलकर चषक स्पर्धेतल्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात विजय मिळवण्यासाठी भारताला आता १३५ धावांची आवश्यकता आहे. लंडनमधल्या लॉर्ड्स मैदानावर सुरु असलेल्या या सामन्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी भारत चार बाद ५८ धावांपासून पुढे खेळेल. भारतीय प्रमाण वेळेनुसात दुपारी साडे तीन वाजता या खेळाला सुरुवात होईल.

****